# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ११/०५/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत ३४ कि. मी. अंतरावरील खापा निपाणी शिवार येथे दिनांक ०८/०६/२०२१ चे १०.०० ते ९/५/२२ चे १५.२२ वा. दरम्यान **कवडु गोविंद भोंडवे(मृतक) वय ८५ वर्श रा. डेगमा खुर्द ता. हिंगणा** याची कवटी व हाडाचे अवषेश तसेच अंगावरील कपडे व बुट, आधार कार्ड व लाल रंगाचा कडदोरा घटनास्थळी मिळुन आला असुन फिर्यादी यांनी पोस्टे कोंढाळी येथे येवुन मृतक जवळील सापडलेल्या वस्तुची पाहणी करून ओळखले असता 'ते माझे वडील कवडु गोविंद भोंडवे वय ८५ वर्ष रा. डेगमा खुर्द ता.हिंगणा' यांची असल्याची खात्री झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविन्द्र कवडु भोंडवे(मृतक) वय ४० वर्श रा. डेगमा खुर्द ता.हिंगणा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री सोनावले मो. नं. ९३७३७४०८१४ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कुही :– अंतर्गत २२ कि.मी. अंतरावरील मौजा सुरगाव शिवार येथे दिनांक ०७/०३/२२ चे ११.०० वा. ते ०९/०५/२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादीची पत्नी नामे– **सौ. वर्षा जयेंद्र उके(मृतक), वय ३४ वर्ष, रा. सुरगाव, ता. उमरेड, जि. नागपुर** हि दि. ०७/०३/२२ रोजी कोणालाही काही न सांगता घरून निघुन गेली होती. दि. ०९/०५/२२ रोजी गावातील दिनेश खोंडे हा गाडबैले यांच्या शेतासाठी पाणी वापरासाठी विहिरीवर गेला असता त्याला विहिरीमध्ये एक प्रेत मृत अवस्थेत दिसुन आले. त्याने गावातील लोकांना व पोलीसांना माहिती दिली. त्यानंतर पोलीस आल्यानंतर प्रेत बाहेर काढले सदरचे प्रेत एक महिलेचे कुजलेल्या अवस्थेत दिसुन आले. तिचे पुर्ण शरीर सडुन गेले होते. पोलीस कारवाई करून फिर्यादीने मिसिंग रिपोर्टमध्ये सांगितल्याप्रमाणे वर्णनाप्रमाणे अंगात घातलेले पिवळया रंगाचा कुर्ता व कथ्या रंगाचा पैजामा व गळयात विक्रती मंगळसुत्र व तिच्या बांध्यावरून तसेच विहिरीत पडुन तरंगत असलेल्या पॅरेगॉन स्लीपर वरून यातील फिर्यादीने त्याची पत्नीचे प्रेत असल्याचे खात्री केली. मृतक हिने स्वत: विहिरीतील पाण्यात उडी घेउन आत्महत्या केली किंवा कोणी तिचा घातपात केला असावा याबाबत काहीच माहित नसुन तिचा मृत्यु कसा झाला हे माहित नसल्याचे रिपोर्टवरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जयेंद्र महादेव उके, वय ३६ वर्ष, रा. सुरगाव, ता. उमरेड, जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार नामदेव पुजारी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर